**दादापाटील राजळे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**
**आदिनाथनगर तालुका पाथर्डी जिल्हा अहमदनगर**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**2020-2021**

## नियमित कार्यक्रम अहवाल

### 1)वन महोत्सव

दिनांक 30 जून सात जुलै या कालावधीत महाविद्यालयात वन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयात 150 वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना आपापल्या गावांमध्ये अंगणासमोर वृक्षारोपण करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. त्याप्रमाणे 200 विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले.

### 2) मास्कचे वाटप

संस्थेचे संस्थापक स्वर्गीय दादापाटील राजळे भाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त 30 जून रोजी महाविद्यालयात प्रवेशासाठी उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मास्कचे वाटप करण्यात आले. यावेळी श्री. वृध्देश्र्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मा. श्री. रामकिसन काकडे, संचालक मा.श्री. सुभाष ताठे हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी स्व. भाऊंच्या स्मृतीस उजाळा दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यावेळी त्यांनी भाऊंची कॉलेज काढण्यामागिल भूमिका सांगितली. तर श्री. वृध्देश्र्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मा. श्री. रामकिसन काकडे भाऊनी कारखाना व कॉलेज उभारतांना घेतलेल्या परिश्रमा विषयी माहिती दिली. तर संचालक मा.श्री. सुभाष ताठे यांनी नविन प्रवेश घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात स्वागत करुन विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे अभार कार्यक्रम आधिकारी प्रा. आसाराम देसाई यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचा सर्व स्टाफ उपस्थित होता.

### 3) गणपती उत्सव

दरवर्षीप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयामध्ये गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करून गणेश उत्सव साजरा करण्यात आला. दि. 22 ऑगस्ट ते 1 सप्टेंबर 2020 या कालावधीत हा उत्सव साजरा करण्यात आला.

### 4)फिट इंडिया

फिट इंडिया अंतर्गत महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. व व्यायामाचे महत्व लोकांना पटवून देण्यात आले

**5)** 5 सप्टेंबर रोजी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना आपल्या घरून कोणत्याही एका टॉपिक वर एक व्हिडिओ तयार करून पाठविण्याचे सांगितले. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी व्हिडिओ तयार केले. यात 20 स्वयंसेवक सहभागी झाले.

**6)** 2 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली.

**7)** 31 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. त्यादिवशी महाविद्यालयात उपस्थित असणाऱ्या सर्वांना राष्ट्रीय एकता शपथ देण्यात आली.

**8)** दादापाटील राजळे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आर. जे. टेमकर व कार्यालयीन अधिक्षक श्री विक्रम राजळे यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व संविधान सरनामा यांचे प्रतिमापूजन केले यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर आर. जे. टेमकर सर यांनी भारतीय राज्यघटना निर्मितीचा प्रवास व राज्यघटनेने भारतीय नागरिकांना दिलेली मूलभूत अधिकार व कर्तव्य याविषयी मार्गदर्शन केले तसेच भारतीय राज्यघटना ही भारतीय लोकशाहीचा आधार आहे. असे त्यांनी म्हटले यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक आसाराम देसाई डॉक्टर साधना म्हस्के प्राध्यापक असलम शेख यांनी केले

**9)** 1 डिसेंबर जागतिक एड्स दिन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एड्स या रोगाविषयी जनजागृती करण्यात आली.

**10)** 4 जानेवारी रोजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीचे आयोजन करण्यात आले.

**11)राष्ट्रीय युवक दिन**

दादापाटील राजळे महाविद्यालयात मध्ये रविवार दिनांक 12 जानेवारी रोजी राष्ट्रीय युवक दिना निमित्त राजमाता जिजाऊ जयंती. सहकार महर्षी स्वातंत्र्यसैनिक स्व-भाऊसाहेब थोरात यांची जयंती, कृषीक्रांतिचे सेनानी डॉक्टर अण्णासाहेब शिंदे यांचे पुण्यस्मरण आणि स्वामी विवेकानंद जयंती मोठ्याा उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक मा. श्री आर. वाय म्हस्के हे होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. उपप्राचार्य मा-श्री. किसनराव माने यांनी विद्याथ्र्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की अणासाहेब शिंदे. भाउसाहेब थोरात हे आधुनिक महाराष्ट्राचे षिल्पकार आहेत. आजचा तरुण हा स्वप्नाळू व प्रश्नाळु असावा त्याला उच्च ध्येयाची स्वप्न पडावीत तर त्याने प्रत्येक गोष्टीला प्रश्न विचारले पाहीजे. आपल्या परंपरामधल्या चांगल्या गोष्टी शोधुन त्या आचरणात आणले पाहिजे. तसेच त्यानी स्वामी विवेकानंदाचे जीवन विचार व तत्वज्ञान या विषयी विद्याथ्र्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ- आर जे टेमकर सर यांनी केले याप्रसंगी त्यांनी अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात यांचे जीवनकार्याचा आढावा घेतला. तरुणांनी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी सद्विचारी आणि अभ्यासात सातत्य ठेवणे आवष्यक आहे असा संदेश त्यानी प्रास्ताविकातुन दिला. या वेळी महाविद्यालयातील विद्याथ्र्यानी सुरु केलेल्या युवा स्पंदन या न्युज चॅनलचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते केले. अध्यक्ष मनोगतातून माननीय श्री आर वाय म्हस्के यांनी राष्ट्रीय युवा दिनाच्या विद्याथ्र्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेविका स्मिता कचरे हिने केले. आभार प्रा. षामराव गरड यांनी मानले केले. या कार्यक्रमाया यषस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक आसाराम देसाई, डॉ. साधना म्हस्के, प्रा.जयश्री दरंदले- प्रा अस्लम शेख यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर जे टेमकर सर यांनी मार्गदर्शन केले

**11)** 25 जानेवारी रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मतदान जागृती अभियान राबविण्यात आले. त्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी ज्या विद्यार्थ्यांचे वय 18 पुर्ण झाले आहे. अशा सर्वांना आपले नाव

मतदार यादीत नोंदण्याठी प्रात्साहित केले. तसेच त्यांना नाव नोंदणीसाठी आवश्यक कागद पत्रांची माहिती दिली. यात 150 स्वयंसेवक सहभागी झाले.

**12) शिवजयंती**

दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात 19 फेब्रुवारी 2019 रोजी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. यानिमित्ताने महाविद्यालयात इतिहास विभाग व एनएसएसच्या वतीने जयंती सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी इतिहास विभाग प्रमुख प्राध्यापक राजू घोलप यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे राजनीती की यावर सविस्तर व्याख्यान दिले तसेच . शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर , कारखान्याचे संचालक व महाविद्यालयातील शिक्षक वृंद उपस्थित होता. या कार्यक्रमाचे आभार इतिहास विभागातील प्राध्यापक व एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. आसाराम देसाई यांनी मानले. या वेळी इतिहास विभागातील विद्यार्थी व एनएसएस स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होती त्याचप्रमाणे जिल्ह्यातून आलेले बुद्धिबळपटू या वेळी उपस्थित होते.

**13)** 8 मार्च रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे हेल्थ चेकअप कॅम्प आयोजित करण्यात आला.

प्रा आसाराम देसाई<br>
डॉ. साधना म्हस्के<br>
कार्यक्रम आधिकारी

डॉ. राजधर टेमकर<br>
प्राचार्य